## नियमित दिवाणी दावा क्र.१०३०/२०२२ मधील निशाणी क्र.६८ वरील आदेश

## पारीत दिनांक ०३ डिसेंबर, २०२५

CNR NO.MHLA060026762022

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

०२. अर्ज, त्यावरील प्रतिवादी यांचे म्हणणे व दाव्याचे अवलोकन केले.

०३. वादीचे अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे –

दावा वादग्रस्त जमिनीची मालकी जाहीर करून निरंतर मनाई हुकुम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा दाखल करतेवेळी वादीने खरेदीखताचा सत्यप्रती दाखल केल्या आहेत. दावा परिच्छेद क्र.२ मध्ये खरेदीखताचा क्रमांक लिहीणे अनावधानाने राहून गेले आहे. दावा दाखल केल्यानंतर वादीने गहाळ झालेले मुळ खरेदीखत हुडकण्याचा प्रयत्न केला परंतु ते वादीस मिळून आलेले नाही. दाव्याचे यश, अपयश मुळ खरेदीखतावर अवलंबून आहे. जे वादीस मिळून येत नाही. त्यामुळे वादीस दाव्यामध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करणे आवश्यक आहे.

०४. प्रस्तावित दुरूस्ती –

परिच्छेद क्र.२ मध्ये पाचव्या ओळीमध्ये खरेदी घेतली आहे. **पुढे 'ज्याचा खरेदी खत क्र.८३ असून' व परिच्छेद क्र.४ च्या शेवटी 'वादीने दिनांक १३.०१.१९७२ रोजी करून घेतलेले क्र.८३ हे हरवले आहे, त्यामुळे या प्रकरणामध्ये मुळ खरेदीखत दाखल करून शकत नाही'.**

०५. वादीचे पुढे कथन की, प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याच्या मुळ गाभ्यामध्ये व मागणीमध्ये फरक पडत नाही. सबब, त्यांनी अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०६. प्रतिवादी यांनी अर्ज कायदेशिर नसल्याने नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०७. दाव्याचे स्वरूप लक्षात घेता प्रस्तावित दुरूस्ती ही संपरिक्षा चालू झाल्यानंतर करण्याची परवानगी मागितलेली असली तरीही ती तांत्रीक व औपचारिक

स्वरूपाची वाटते. तसेच त्यामुळे प्रतिवादीच्या बचावास बाधा येणार नाही. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल करण्यास उपयुक्त ठरणार आहे. सबब, अर्ज खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. यास्तव मी खालील आदेश पारित करते.

**आदेश**

१. अर्ज रुपये ५००/– खर्चासह मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना समान विभागुन देण्यात यावी.

२. वादी यांना अर्जात नमुद दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादीने दुरुस्ती दोन आठवडयांच्या आत करुन दुरुस्त दावा दाखल करावा.

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.12.03 17:51:06 +0530

**दिनांक : –** ०३.१२.२०२५. **(स्वानंदी दे. वडगांवकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

अहमदपूर